# सन २०१३-१६ करिता

# ठोक पाणी वापराच्या

# दर निर्धारणाच्या निकषांकरिता

# दृष्टिनिबंध

## प्राप्त अभिप्राय / सूचना आणि मजनिप्राचा प्रतिसाद

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई (भारत)

# अभिप्राय / सूचनांची गटवारी

| | | |
|---|---|---|
| क | कार्यपध्दती विषयक बाबी | १ ते ३ |
| ख | ठोक पाणी प्रशुल्क निर्धारणाची पध्दत | ४ ते ५ |
| ग | समन्यायता | ६ |
| घ | मत्ता व्यवस्थापन | ७ ते ९ |
| ङ | परिचालन विषयक बाबी | १० |
| च | कृषिसिंचन प्रशुल्क | ११ ते १४ |
| छ | शासकीय उपसा योजना | १५ |
| ज | खाजगी उपसा योजना | १६ |
| झ | घरगुती वापरासाठी प्रशुल्क | १७ ते १८ |
| ञ | औद्योगिक वापरासाठी प्रशुल्क | १९ ते २१ |
| ट | प्रदूषण व पर्यावरणासाठी विसर्ग | २२ ते २३ |
| ठ | प्रशुल्कासंबंधित नसलेल्या बाबी | २४ ते २५ |

# २०१३-१६ करिता ठोक पाणी वापराच्या दर निर्धारणाच्या निकषांकरिता दृष्टिनिबंधावर प्राप्त अभिप्राय / सूचना आणि मजनिप्राचा प्रतिसाद

| अनु.क्र. | प्राप्त अभिप्राय / सूचना | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|
| | **क - कार्यपध्दती विषयक बाबी** | |
| १. | दृष्टीनिबंधावर प्रत्येक महसूल विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी जनसुनावणीद्वारे सल्लामसलत करण्यासाठी बैठका आयोजित करण्यात याव्यात व तसेच तद्‌नंतर प्रशुल्क निर्धारणाच्या निकषाबाबतही अशा बैठका घेण्यात याव्यात. | मजनिप्रा अधिनियमातील कलम ११(घ) मध्ये पाणी प्रशुल्क निर्धारणाचे निकष ठरविण्यासाठी लाभार्थी किंवा उपभोक्त्यांच्या मतांची खात्री करुन घेण्याबाबत तरतूद आहे. त्यानुसार मजनिप्रा (ठोक जलप्रशुल्क निर्धारणाकरिता निकषांचे निश्चितीकरण व आदेश काढणे ) विनियम, २०१० मध्येही निकषांच्या मसुद्यावरील लाभार्थी जनतेची मते अजमाविण्याकरिता सर्व महसूल विभागीय मुख्यालयाच्या ठिकाणी जनसुनावणी घेण्याबाबत निर्देश आहे. तथापि प्राधिकरणाने दोन्ही - दृष्टीनिबंधावर तसेच निकषाच्या मसुद्यावर-समाईक जनसुनावणी आयोजित करण्याचे ठरविले आहे. |
| २. | तालुका पातळीवर दृष्टीनिबंधाच्या प्रती उपलब्ध केल्यानंतर अभिप्राय देण्याकरिता ३ महिने कालावधी देण्यात यावा कारण १ महिना कालावधी अपुरा आहे. | दृष्टीनिबंधाच्या प्रती दि.७/४/२०१२ पासून सर्व तालुका पातळीवर उपलब्ध करुन दिल्या असून अभिप्राय देण्याची मुदत दि. ३० जून २०१२ पर्यत वाढविलेली होती. |
| ३. | गेल्या २ वर्षात पाणी प्रशुल्क २०१०-१३ च्या अनुषंगाने आलेल्या अनुभवाचा विचार करण्यात आलेला नाही. | जलवर्ष २०१०-११ मधील आकारणी व प्रत्यक्ष वसुली याबाबतच्या माहितीचे संकलन जलसंपदा विभागामार्फत करण्यात येत आहे. जलवर्ष २०११-१२ हे नुकतेच दि.३०-६-२०१२ रोजी संपलेले असून महितीचे संकलन जलसंपदा विभागामार्फत केले जाणार आहे. प्राप्त होणाऱ्या माहितीचे आधारे निकष अंतीम करण्याचे प्रस्तावित आहे. |
| ४. | दृष्टीनिबंधातील ठळक मुद्दे गावपातळी पर्यंत तसेच पाणी वापर संस्था स्तरापर्यंत प्रसारीत होणे आवश्यक आहे. | दृष्टीनिबंध तालुका पातळीपर्यंत ठेवण्यात आल्याबाबत प्रत्येक जिल्हयातील एका प्रमुख मराठी वर्तमानपत्रातून प्रसिध्दी करण्यात आली होती. तसेच गावपातळीपर्यंत व पाणी वापर संस्थास्तरापर्यंत व्यापक प्रसार होणेचे दृष्टीने दूरचित्रवाणी व आकाशवाणीवर बातम्या/ /निवेदनाद्वारे मोठया प्रमाणावर प्रसिध्दी करण्यात आली. |

| अनु.क्र. | प्राप्त अभिप्राय / सूचना | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|
| | **क - कार्यपध्दती विषयक बाबी** | |
| ५. | खोरे / उपखोरे निहाय तसेच पाणी वापर संस्था निहाय (प्रकल्पस्तरीय / कालवास्तरीय / वितरीकास्तरीय) पाणी प्रशुल्काचे निर्धारण करण्यात आलेले नाही. | दृष्टीनिबंधातील प्रकरण १ मधील परिच्छेद १.८ मध्ये आधीच स्पष्ट केलेले आहे की, पाटबंधारे विकास महामंडळांचे स्वतंत्र वित्तीय संस्था अशा नदी खोरे निहाय अभिकरणामध्ये अद्याप रुपांतर झालेले नाही. त्यामुळे पूर्ण राज्यासाठी एक सारखी प्रशुल्क रचना चालू ठेवण्यात येत आहे. वरच्या स्तरावरील पाणी वापर संस्थाच्या अनुषंगाने, दृष्टीनिबंधातील प्रकरण - ७, परिच्छेद ७.१८ व ७.१९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे लघुवितरिकास्तरीय पाणी वापर संस्थाकरिता घनमापन पध्दतीने पाणीवापर दर ठरविण्यात येतील आणि वरच्या स्तरावरील पाणी वापर संस्था जसजश्या देखभाल-दुरुस्तीची जबाबदारी जलसंपदा विभागाकडून त्यांच्याकडे घेतील तसतसे त्यांना वाल्मीच्या मापदंडानुसार देखभाल-दुरुस्तीसाठी अनुदान मिळेल. |
| ६. | मजनिप्रा अधिनियमातील कलम ११ (घ) मधील तरतूद ही फक्त ठोक पाणी प्रशुल्काला लागू आहे व किरकोळ पाणी प्रशुल्काला लागू नाही, हे कशावरुन ते स्पष्ट होत नाही. | मजनिप्रा अधिनियमातील कलम ११ (घ) मधील तरतूदीनुसार प्राधिकरणाने उपखोरे, नदीखोरे आणि राज्यस्तरावरील पाणीपट्टी ठरविणे अभिप्रेत आहे; प्रकल्पस्तरावरील नाही. महाराष्ट्र राज्य जलनीती (२००३) मधील ठोक पाणी पुरवठा आणि पाण्याचे दर या शीर्षकाखालील परिच्छेद ४.४ मध्ये पाणी वापराच्या सर्व प्रवर्गातील सर्व पाणी वापरकर्त्या गटांकडून जलसेवा पुरविण्याचा समुच्चयित खर्च पाणी प्रशुल्काद्वारे वसूल करणारी पारदर्शक पध्दत बसविण्यात यावी, असा निर्देश आहे. असे पाणी वापरकर्ते गट ठोक पाणी वापरकर्ते आहेत. |
| ७ | जनसुनावणी ही फक्त निकषांपुरती मर्यादित न ठेवता पाणी प्रशुल्क निर्धारणाच्या पध्दतीकरिता सुध्दा घेण्यात यावी. | ठोक जलदर प्रशुल्क निर्धारणाच्या पध्दती निकषातील विविध परिशिष्टामध्ये दिलेल्या आहेत. त्याबाबत जनसुनावणी दरम्यान पाणी वापरकर्त्यांची मते आजमावून घेतली जातील. क्षेत्राधारित कृषिसिंचन प्रशुल्क परिगणना करण्याची तत्वेसुध्दा सविस्तर दिलेली आहेत. त्या तत्वावर पीकनिहाय प्रशुल्काची परिगणना करण्यात येईल. व त्याचा समावेश प्रशुल्क प्रस्तावात करुन लाभार्थींच्या अभिप्रायासाठी उपलब्ध |

| अनु.क्र. | प्राप्त अभिप्राय / सूचना | मजनिप्राचा प्रतिसाद |
|---|---|---|
| | **क - कार्यपध्दती विषयक बाबी** | |
| | | करुन देण्यात येईल. केवळ निकष अंतिम करणे साठीच जनसुनावणी घेणेबाबत तरतुद अधिनियमात आहे. |
| ८. | पाणीपट्टीचे पुनर्विलोकन व पुनरिक्षण दर तीन वर्षांनी करण्याबाबतच्या मजनिप्रा अधिनियमातील तरतुदीमध्ये अंशत: बदल करुन तसे ५ वर्षांनी करणेबाबत शासनास विनंती करण्यात येईल. | अधिनियमात यथोचित सुधारणा करणेबाबत शासनास सुचविण्याचे प्रस्तावित आहे. |
| ९. | सर्व प्रकारच्या सवलती व अर्थसहाय्य इत्यादीबाबत स्वतंत्रपणे विवरण तयार करण्यात यावे व सुसंगत अनुदान शासनाकडून वितरित करण्यात यावे. त्याचप्रमाणे दंड / शास्ती इत्यादी बाबत ही स्वतंत्र विवरण तयार करुन ठेवावे. ही सर्व आधारसामुग्री जनतेच्या अवलोकनासाठी खुली रहावी. | प्रचालन व परिरक्षणासाठी पूर्ण अनुदान राज्याच्या अंदाजपत्रकात वर्षारंभी मंजूर होते आणि पाणीपट्टी ही हंगामा अखेर / वर्ष अखेर वसूल केली जाते. त्यामुळे सवलती व अर्थसहाय्य यांच्या अनुषंगाने असलेली सूचना ही २०१३-१६ करिताचे प्रस्तावित निकषांतील कलम ११ नुसार सुसंगत नाही. राज्यशासनाने प्रत्येक वर्ष अखेरीस प्रचालन व परिरक्षण खर्च व वसूल झालेला महसूल इत्यादी तपशील देणे आवश्यक आहे. |

| | ख - ठोक पाणी प्रशुल्क निर्धारणाची पध्दत | |
|---|---|---|
| अनु.क्र. | प्राप्त अभिप्राय / सूचना | मजनिप्राचा प्रतिसाद |
| १. | ठोक पाणी प्रशुल्क निर्धारणासाठी तयार केलेल्या कोष्टकामध्ये भारांकन ठरवून दिले आहे. सदर भारांकन व्यक्तिनिष्ठ असून योजकागणिक बदलू शकते. ठोक पाणी प्रशुल्क निर्धारणासाठी कोष्टका व्यतिरिक्त असलेल्या अन्य पध्दतीवर जनसुनावणी दरम्यान चर्चा व्हावी. | भारांकन हवे तसे बदलणे शक्य नाही कारण निकषांमधील सुधारणा ही प्रस्थापित कार्यपध्दती अनुसरुन त्याचबरोबर जनसुनावणी आयोजित करुन करण्यात येते. भारांकनाबाबतची तर्कसंगती २०१०-१३ च्या दृष्टीनिबंधामध्ये नमूद केलेली आहेच. भारांकनात सुधारणा करण्याच्या अनुषंगाने प्राप्त सुचनांचा विचार करुन २०१३-१६ च्या दृष्टिनिबंधात अंशतः बदल केले आहेत. या अनुषंगाने पाणी प्रशुल्क निर्धारणासाठी एकूण राज्यस्तरीय उत्पादनाच्या (GSDP) एका पध्दती व्यतिरिक्त कोणतीही अन्य पध्दत सुचविण्यात आलेली नव्हती. या एकूण राज्यस्तरीय उत्पादनाशी (GSDP) निगडीत असलेल्या पध्दतीबाबत विवेचन दृष्टीनिबंधातील प्रकरण ७ च्या परिच्छेद ७.५ ते ७.७ मध्ये करण्यात आलेले आहे. प्रयास, पुणे हया संस्थेने सुचविलेल्या सुधारित मार्गाचे तत्व अंगीकारावयाचे असेल तर जीवननिर्वाहासाठी लागणाऱ्या पाण्याचे समानतेने वितरण याबाबत धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे जो शासनाने अद्याप घेतलेला नाही.<br>कोष्टकाव्यतिरिक्त अन्य पध्दत जनसुनावणी दरम्यान प्रस्तावित करण्यात आली तर त्या पध्दतीचा विचार करण्यात येईल. |
| २. | पाणी वापर कार्यक्षमता वाढविण्यास पाणी वापरकर्त्यांच्या विविध प्रवर्गांना देण्यात येणाऱ्या सवलती तत्संबंधित अभ्यासावर आधारलेल्या असाव्यात. सवलती केवळ भांडवल-प्राचुर्ययुक्त उपाययोजनांशी निगडीत असू नयेत तर उच्च कार्यक्षमतेने युक्त असलेल्या पारंपारिक उपाययोजनांनाही उत्तेजन देण्यात यावे. | ठिंबक / तुषार सिंचन पध्दतीच्या अवलंबनाने कृषिसिंचनात पाण्यामध्ये बचत होते हे विविध संशोधन संस्था व कृषी विद्यापीठे यांच्याकडून झालेल्या अभ्यासातून सिध्द झाले आहे. प्रस्तावित सवलती हया कोणत्याही कार्यप्रणालीशी संलग्न नसून पारंपारिक अथवा खर्चिक अशा दोन्ही प्रकारच्या पध्दतीच्या अवलंबनाने होणाऱ्या पाण्याच्या बचतीशी संलग्न केलेल्या आहेत. प्रस्तावित सवलतीबाबत एकाही बिगर पाणी वापरकर्त्यां गटाकडून एकही सूचना प्राप्त नाही. |

| | ख - ठोक पाणी प्रशुल्क निर्धारणाची पध्दत | |
|---|---|---|
| **अनु.क्र.** | **प्राप्त अभिप्राय / सूचना** | **मजनिप्राचा प्रतिसाद** |
| ३. | परि. ७.१३(३) नुसार पायाभूत पाणी प्रशुल्कातील सुधारणा अर्जित महसूलावर आधारित असावी. अशा प्रकारे करावयाची सुधारणा केव्हा करावयाची याबाबत उल्लेख नाही पण ही सुधारणा होणे असल्यास नियंत्रण कालावधीत व्हावी. | सदर परिच्छेदातील तरतूद ही प्रशुल्क निर्धारणाशी संबंधित असून आकारणी नंतरच्या महसूलार्जनाशी त्याचा काही एक संबंध नाही क्रमशः तुल्यांकनाच्या प्रक्रियेचा (iteration process) अवलंब करुन विशिष्ट पाणी वापराच्या प्रवर्गाचे प्रशुल्क निश्चित करण्यात येतील ज्यायोगे त्या दरांना वापराच्या अंदाजित परिमाणाने गुणीले असता महसूलाची संभाव्य वसुली व औद्योगिक प्रयोजनार्थ करण्यात आलेले पाणी वाटप यांचा मेळ जमेल. दर सुयोग्य असल्याचे ती खूण होय. |
| ४. | पुच्छ भागातील शेतकऱ्यांची होणारी हितहानि विचारात घेवून प्रचालन व परिरक्षणाच्या वाटप कोष्टकामध्ये प्रमाण व समयोचितता या गुणनिर्देशक घटाकांचे भारांकन कृषिसिंचन प्रयोजनासाठी ३० वरुन २५ पर्यंत कमी करावे तर औद्योगिक प्रयोजनासाठी ते ४५ वरुन ५० पर्यंत वाढवावे. | दृष्टिनिबंधाच्या प्रकरण ७, परिच्छेद ७.३ मध्ये प्रमाण व समयोचितता हया घटकाकरिता कृषिसिंचन प्रयोजनास घरगुती प्रयोजनापेक्षा किंचितसे जास्त भारांकन का दिले आहे याबाबत सविस्तर कारणमीमांसा दिली आहे. |

| | ग - समन्यायता | |
|---|---|---|
| अनु.क्र. | प्राप्त अभिप्राय / सूचना | मजनिप्राचा प्रतिसाद |
| १. | चितळे आयोगाने शिफारस केल्यानुसार जीवननिर्वाहासाठी प्रति माणशी आवश्यक असलेले शेतकऱ्यांसाठी १००० घमी व घरगुती वापरासाठी ४०० घमी प्रति माणशी पाणी हया परिमाणास कमीत कमी दर व त्यापेक्षा जास्त पाणी वापरास वाढत्या क्रमाने दर हया प्रमाणे आकारणी करावी. समन्यायतेचे मुलभूत तत्व म्हणून जीवननिर्वाहासाठी आवश्यक असलेल्या पाण्यास जेवढे शक्य असेल तेवढे किमान प्रशुल्क आकारावे. | चितळे आयोगाची हया बाबतची शिफारस शासनाने अद्याप मान्य केलेली नाही, सुमारे ९० % क्षेत्रास क्षेत्राधारित पध्दतीने पाणी दिले जाते. जरी शेतकऱ्यांना समन्यायी तत्वानुसार जीवननिर्वाहासाठी आवश्यक असलेले पाणी द्यावयाचे ठरविले तरी तसे देणे सद्य परिस्थितीमुळे शक्य होणार नाही. सुमारे १० % क्षेत्रास मसिंपशेव्य अधिनियमातील हक्कदारीच्या व्याख्येनुसार करारनाम्याला अनुसरुन घनमापन पध्दतीने पाणी देण्यात येते.<br>जीवननिर्वाहासाठी प्रति माणशी आवश्यक पाणी पुरवठयाचा प्रश्न घरगुती वापरामध्ये किरकोळ स्वरुपाच्या पुरवठयाच्या वेळीच येईल आणि प्राधिकरणाची कक्षा ग्रामपंचायती / नगरपालिका / महानगरपालिका यांना पुरवियात येणाऱ्या ठोक पाणी पुरवठयाच्या प्रशुल्क निर्धारणापुरतीच मर्यादित आहे.<br>कृषिसिंचनासाठी प्रस्तूत केलेली सध्याची प्रशुल्क रचना अन्नधान्य पिके व नगदी पिके तसेच अल्प व स्वल्प भूधारक आणि विपुल भूधारक यांच्यामध्ये फरक करते. भूधारणेचा आकार आणि वेगवेगळया पिकांसाठी दर ठरविण्याची पध्दती यांच्याशी सवलती निगडीत करुन हे साध्य करण्यात आले आहे. |

| | घ - मत्ता व्यवस्थापन | |
|---|---|---|
| अनु.क्र. | प्राप्त अभिप्राय / सूचना | मजनिप्राचा प्रतिसाद |
| १. | जलसंपदा विभागाकडून मत्ता व्यवस्थापन कसे करण्यात येते याबाबत तपासणी करण्याची काही व्यवस्था मजनिप्राकडे आहे काय ? | अधिनियमामध्ये अशा प्रकारे तपासणीची काहीही तरतूद नाही. सिंचन प्रणालीच्या प्रचालन व परिरक्षणाची जबाबदारी जलसंपदा विभागाची आहे. प्राधिकरणाने निकषातील परिशिष्ट ५, परिच्छेद ४ नुसार देखभाल दुरुस्तीसाठी पुरेसा निधी उपलब्ध करुन द्यावा असे निर्देश दिले आहेत. |
| २ | देखभाल दुरुस्ती खर्चामध्ये ५ % किंवा १० % वाढ केली तर पाण्याचे दर वाढतील. जनसुनावणी शिवाय दरवाढ न करण्याच्या तत्वाची अंमलबजावणी करावी. | २०१३-१६ चे प्रशुल्क निर्धारणाचे निकष हे जनसुनावणीद्वारे लाभार्थीची मते जाणुन घेऊनच अंतीम करण्यात येणार आहेत. |
| ३. | प्रचालन व देखभाल खर्च ठरविण्याबाबत पारदर्शक पध्दत वापरण्यात यावी. | प्रचालन व परिरक्षण खर्चामध्ये आस्थापन खर्च व देखभाल दुरुस्ती खर्च यांचा समावेश होतो. आस्थापना खर्च हा मापदंडानुसार सिंचन व्यवस्थानासाठी नेमणूक केलेल्या कर्मचारी व त्यांचे वेतन ह्या वर आधारित आहे. हा एक अंकगणितीय अभ्यास आहे.<br>देखभाल दुरुस्ती खर्च हा मापदंडाआधारे तसेच सिंचित क्षेत्राचे अनुमान या आधारे परिगणित केला जातो. २०१३-१६ साठीचे मापदंड अंतीम करताना वाल्मीने सिंचन व्यवस्थापनातील तज्ञ, सोपेकॉम व पाणी वापर संस्थांच्या प्रतिनिधींनाही सहयोगी करुन घेतले होते. (पहावे प्रकरण-३, परिच्छेद ३.१०) सिंचित क्षेत्राच्या अंदाजाची अनुमाने प्रकरण ६, परिच्छेद ६.१ मध्ये दिले आहे. यावरुन यामध्ये पूर्ण पारदर्शकता राखल्याचे दिसून येते. |
| ४. | देखभाल दुरुस्ती निधीसाठी प्रकल्प निहाय तरतूद केली जात नाही. | देखभाल दुरुस्ती निधीचे वाटप मोठया व मध्यम प्रकल्पांचेबाबतीत प्रकल्प निहाय केले जाते. लघु प्रकल्पांचेबाबतीत प्रकल्पनिहाय आवश्यकता मंडळनिहाय तपासून फेरवाटप केले जाते. |
| ५. | देखभाल दुरुस्ती मापदंड जनसुनावणी घेऊन तज्ञामार्फत ठरविण्यात यावेत. | २०१३-१६ साठी देखभाल दुरुस्तीचे मापदंडाबाबत शिफारस करण्यासाठी वाल्मीने समितीमध्ये तज्ञांची योजना केली आहे. त्या समितीने केलेल्या शिफारशींचा दृष्टीनिबंधामध्ये समावेश करुन |

| | घ - मत्ता व्यवस्थापन | |
|---|---|---|
| **अनु.क्र.** | **प्राप्त अभिप्राय / सूचना** | **मजनिप्राचा प्रतिसाद** |
| | | जनसुनावणीसाठी आता प्रस्तुत करण्यात येत आहे. |
| ६. | देखभाल दुरुस्ती खर्चासह प्रचालन व परिरक्षण खर्चाचे एकूण चित्र दृष्टीनिबंधामध्ये दर्शविण्यात आलेले नाही. | प्रकरण ६, परिच्छेद ६.३ मध्ये सन २०१०-११ ते सन २०१५-१६ हया कालावधीचा आस्थापना खर्च दर्शविला आहे. (पूर्वीच्या तसेच नवीन नियंत्रण कालावधीचा)<br>देखभाल दुरुस्ती खर्च परिगणना करणेसाठी आवश्यक असलेला तपशील म्हणजे मापदंड प्रकरण -३ परिच्छेद ३.११ मध्ये तर सिंचित क्षेत्राचा अनुमाने प्रकरण ६ परिच्छेद ६.१ मध्ये दिलेला आहे. अशा रीतीने याबाबत एकूण चित्र प्रस्तुत केलेले आहे. |
| ७. | प्राधिकरण हे नियमन प्राधिकरण का खर्चाची वसुली करणारे प्राधिकरण ? | प्राधिकरण हे नियमन प्राधिकरण असून जलसंपत्ती प्रकल्पांच्या प्रशासकीय कार्यचालन व परिरक्षणाच्या पूर्ण खर्चाची वसुली परावर्तीत होईल अशा तऱ्हेने ठोक पाणी प्रशुल्क रचना बसविणे हे कर्तव्य पार पाडण्याची जबाबदारी प्राधिकरणावर २००५ च्या अधिनियमनानुसार सोपविण्यात आलेली आहे. |
| ८. | आस्थापना खर्चाचे नियमन करणे आवश्यक आहे. पाणी वापर संस्थाचे कार्यक्षेत्र पाणी वापर संस्थांना हस्तांतरित झाल्यानंतर कमी होणाऱ्या खर्चाचा विचार होणे आवश्यक आहे. विशेषत: कालवा निरीक्षक व पाटकरी हया प्रवर्गाच्या अस्थापनेचे दायित्व. | प्रकरण ३ मध्ये सिंचन व्यवस्थानासाठी आवश्यक असलेल्या अस्तित्वातील आस्थापना पदाबाबत मापदंड दिलेले आहेत. मापदंडानुसारच्या पदांवर नेमणूक केली जाते व त्यांच्या वेतनावरील खर्च हा प्रशुल्काद्वारे वसूल करावयाचा आहे. लघुवितरिका खालील कार्यक्षेत्र पाणी वापर संस्थांना हस्तांतरित झाल्यानंतर निम्नस्तरीय कर्मचारी देखभाल दुरुस्तीच्या कामावरुन कमी करुन इतरत्र वर्ग करण्यात येतील. कृपया दृष्टिनिबंधातील परिच्छेद ३.६ चे अवलोकन व्हावे. |
| ९. | ६ व्या वेतन आयोगाचे दायित्व आता विचारात घेतले आहे, पूर्वी विचारात घेतले नव्हते. | मजनिप्रा अधिनियमातील कलम ११ (घ) नुसार जलसंपत्ती प्रकल्पांच्या प्रचालन व परिरक्षण खर्चाची पूर्ण वसुली होणे आवश्यक आहे. आस्थापना खर्चाच्या दायित्वाचा समावेश एकूण खर्चात न करणे या पुढेही चालू ठेवले तर शासनावरील अर्थसाहाय्याचा बोजा वाढेल. |

| | घ - मत्ता व्यवस्थापन | |
|---|---|---|
| अनु.क्र. | प्राप्त अभिप्राय / सूचना | मजनिप्राचा प्रतिसाद |
| १०. | भांडवली खर्चाचा प्रभाव देखभाल दुरुस्ती खर्चावर असतो. भांडवली खर्चाचे नियमन करण्यासाठी कोणतीही तरतूद नाही. | अधिनियमातील तरतूदीनुसार हयाबाबत प्राधिकरणाची काहीही भूमिका नाही. |
| ११. | देखभाल - दुरुस्ती खर्चाच्या अंदाजासाठीच्या आधारमानानुसार देखभाल - दुरुस्ती खर्चाच्या नियमनामध्ये प्रशुल्क निर्धारणार्थ विचारात घेताना मजनिप्राला यथोचित व निर्णायक भूमिका दिलेली नाही. देखभाल खर्चाचे प्रत्यक्ष दायित्व वैध मापदंडाधारे ठरविणे आवश्यक आहे. वैधतेची खातरजमा न केलेले सरासरीवर आधारित व तपासणी न झालेले मापदंड अवलंबिल्यामुळे देखभाल दुरुस्तीसाठी अपुरा निधी मिळेल. परिणामी प्रशुल्क भरणेबाबत तयारी राहणार नाही. | देखभाल दुरुस्तीचे मापदंड निर्धारित करणे ही जलसंपदा विभागाची जबाबदारी आहे. हे काम जलसंपदा विभागाने वाल्मीकडे सोपविलेले असून वाल्मीकडून हया अभ्यासासाठी तज्ञांचा एक गट स्थापन करण्यात आला. सदर तज्ञांच्या गटामध्ये अशासकीय संस्था व पाणी वापर संस्थाचा समावेश करण्यात आलेला होता. प्रस्तावित केलेले मापदंड पुरेसे असल्याबाबत व त्यामुळे मत्ता व्यवस्थापन योग्य रितीने होईल, केवळ हया बाबत खातरजमा प्राधिकरणाने करावयाची आहे. |

| | ङ - परिचालन विषयक बाबी | |
|---|---|---|
| **अनु.क्र.** | **प्राप्त अभिप्राय / सूचना** | **मजनिप्राचा प्रतिसाद** |
| १. | पाण्याचा गृहीत धरलेला व्यय ५० % नसून ६७ % आहे. दर ठरविताना व्ययासह पाण्याचे एकूण परिमाण विचारात घ्यावे व त्यातील २/३ भाग शासन अर्थसहाय्य समजावे. | दृष्टीनिबंधातील परिशिष्ट ७.१ चे अवलोकन करावे ज्यामध्ये सिंचनासाठी घनमापीत परिमाणावर प्रशुल्क कसे परिगणित करावयाचे याची पध्दत विशद केली आहे. पाणी वापर संस्थेने कालव्याच्या मुखाशी किती पाणी घेतले यावरुन प्रशुल्क परिगणित केले जाते. प्रत्यक्ष आकारणीमात्र पाणी वापरसंस्थेला लघुवितरिकेच्या मुखाशी किती पाणी दिले यावर आधारलेली असते. अशा प्रकारे व्ययाचा भार राज्य शासन उचलते. |
| २. | मसिंपशेव्य अधिनियम २००५ ची अंमलबजावणी सुरु झाल्यानंतर ही पुच्छ भागातील शेतकऱ्यांना पाणी मिळत नाही. | महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्प या जागतिक बँक अर्थसाहाय्यित प्रकल्पांतर्गत मसिंपशेव्य अधिनियम - २००५ लागू झालेल्या २३६ पाटबंधारे प्रकल्पांची पुनर्स्थापनेची कामे करण्यात येत आहेत. सन २०१४ च्या सुमारास ही कामे पूर्ण होणे अपेक्षित आहे सिंचनासाठी पाणी सुरळितपणे मिळण्यासाठी आवश्यक असलेली पुनर्स्थापनेची कामे त्याच धर्तीवर अन्य प्रकल्पांवर करण्यास निधीच्या मर्यादा आहेत. |
| ३. | चोरी व पाणी गळती मुळे कमी होणाऱ्या पाण्याचे परिमाण निश्चित करण्याची कार्यवाही सुरु करणे आवश्यक आहे. तसेच अशा व्ययाचा भार पाणी वापरकर्त्यांवर टाकू नये. | घनमापन पध्दतीने पाणी घेणाऱ्या पाणी वापर संस्थांना लघुवितरिकेच्या मुखाशी मोजून दिलेल्या पाण्याच्या आधारे पाणीपट्टीची आकारणी केली जाते. अशा प्रकारे मार्गस्थ व्ययाचा भार त्यांचेवर टाकला जात नाही. |
| ४. | मुख्य कालवा, वितरिका व लघुवितरिकांवरील प्रत्यक्ष वहनव्यय हा आवक-जावक पध्दतीने मोजण्यात यावा. यामध्ये लोकसहभागात्मक बैठक असावी व तपशीलामध्ये पारदर्शकता असावी. | हया बाबत अभ्यास वाल्मी औरंगाबाद मार्फत काही प्रातीनिधीक प्रकल्पावर सुरु आहे. तपशील अंतीम झाल्यावर तो सर्वांसाठी खुला राहील. |
| ५. | मोजमाप यंत्रणा बसविलेल्या नाहीत वा व्यवस्थित कार्यरत नाहीत. | महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गतच्या सर्व २३६ प्रकल्पांवर मोजमाप यंत्रणा बसविली जाईल. सर्व १५१४ पाणी वापर संस्थांना घनमापन पध्दतीने पाणी मोजून दिले जाईल. |

| | च - कृषिसिंचन प्रशुल्क | |
|---|---|---|
| **अनु.क्र.** | **प्राप्त अभिप्राय / सूचना** | **मजनिप्राचा प्रतिसाद** |
| १. | शेतजमीन महिलाच्या नावे नोंदणी करण्यासाठी प्रोत्साहन देण्यात यावे. | बहुधा ही शिफारस विदर्भातील आत्महत्याग्रस्त जिल्हयातील पतीच्या दुर्दैवी आत्महत्येनंतर महिलांनी व्यवस्थापनासाठी हाती घेतलेल्या शेतजमिनीच्या संदर्भात करण्यात आलेली आहे. अशा ग्रस्त महिलांनी मागणी केल्यास ह्या मागणीबाबत विचार करता येईल. |
| २. | दोन पेक्षा जास्त मुले असलेल्या शेतकऱ्यांना सर्व सवलती मिळाव्यात. | दोनपेक्षा जास्त मुले असलेल्या शेतकऱ्यांना कायद्यानुसार असलेल्या अनुज्ञेय दरावर सवलत देय राहील. अशा शेतकऱ्यांना सवलत देण्याबाबत प्राधिकरणाने कोठेही नाकारलेले नाही. |
| ३. | पीक उत्पादनाचे बाजारभाव शेतकऱ्यांना परवडण्यासारखे नाहीत व त्यामुळे कृषि सिंचनाचे दरात वाढ करु नये. | प्राधिकरणाने पाण्याचे दर पुढील तीन वर्षामधील संभाव्य प्रचालन व परिरक्षण खर्चाची पूर्ण वसुली होईल अशा रितीने दर ३ वर्षांनी पुनर्विलोकित व सुधारित करावयाचे आहेत.<br>प्रचालन व परिरक्षण खर्चात मुख्यत: आस्थापना खर्चातील वाढीमुळे वाढ होणार असल्यामुळे पाण्याचे दर वाढविणे आवश्यक ठरते. तथापि अर्थसहाय्य देऊन एखाद्या पाणी वापर प्रवर्गाला पूर्वीचे दर ठेवायचे किंवा कसे याबाबत शासनास निर्णय घ्यावा लागेल. |
| ४. | दृष्टीनिबंधामध्ये ठिबक / तुषार सिंचनास प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने शेततळी निर्माण करणाऱ्या शेतकऱ्यांना सवलत देण्याची शिफारस केली आहे. केवळ ज्यांच्याकडे अतिरिक्त जमीन आहे असे मोठे शेतकरी शेततळी बांधतील. सबब शेततळयांसाठी वेगळी सवलत देऊ नये. | अधिनियमातील कलम १४ (४) ची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने प्रवाही कालवा पध्दतीमध्ये ठिबक/तुषार पध्दतीचा अवलंब करण्यासाठी शेततळी अनिवार्य आहेत. तसेच ठिबक/तुषार पध्दती पाण्याच्या बचतीसाठी जास्त पाणी लागणाऱ्या ऊस/केळी इत्यादी पिकास उपयुक्त आहेत. |
| ५. | शासनाने विहिरीवरील सिंचनास पाणीपट्टी न आकारण्याच्या घेतलेल्या निर्णयाचा पुर्नविचार करावा. विहिरींचे मालक असलेल्या व सधन अशा शेतकऱ्यांनाच ह्या सलवतीचा लाभ मिळतो. | हि धोरणात्मक बाब असून शासनाचे अधिकारातील आहे. |

| | च - कृषिसिंचन प्रशुल्क | |
|---|---|---|
| **अनु.क्र.** | **प्राप्त अभिप्राय / सूचना** | **मजनिप्राचा प्रतिसाद** |
| ६. | कोकण व विदर्भासाठीच्या हंगामाच्या तारखा व कालावधी बदल्यामुळे शेतकरी भात / धान पिकाच्या दिर्घ काळाने पक्व होणारी वाणं पसंत करतात कारण विलंबाने होणाऱ्या मालामुळे त्यांना चढाभाव मिळतो. परिणामी रबी हंगाम सुरु होण्यास विलंब लागतो. यास्तव संपूर्ण राज्यात हंगामाच्या तारखा व कालावधी सारखा निश्चित करावा. त्यामुळे शेतकऱ्यांना कमी कालावधीत पक्व होणारी वाणं घेणे भाग पडेल. | कोकण व विदर्भासाठीच्या हंगामाच्या तारखा व कालावधी बदलण्याची कार्यवाही जनसुनावणीमध्ये करण्यात आलेल्या मागणीनुसार झालेली आहे. जलसंपदा विभागाने देखील त्या प्रस्तावास सहमती दर्शविलेली असून तारखांमधील सदर बदल मराठवाडा विभागाकरिताही लागू करणेबाबत सूचना केली आहे. |
| ७. | सवलतीस पात्र होण्याची वापरकर्त्यांची जोखीम कमी करावी. | सवलतीस पात्र असताना (प्रत्यक्षात) सवलती मिळणे अवघड जात असल्याबद्दल एकाही शेतकऱ्याकडून तक्रार प्राप्त झालेली नाही. जर याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या तर त्यांची दखल घेतली जाईल. |
| ८. | कुटुबांच्या आकाराशी निगडीत असलेल्या दंडनीय आकारणीच्या तरतूदीबाबत सामाजिक संस्थांच्या तीव्र भावनाबाबत प्राधिकरणाने शासनास कळविण्यात यावे. | मजनिप्रा अधिनियम २००५ हा विधीमंडळात राज्याच्या लोकप्रतिनिधींनी मंजूर केलेला असल्यामुळे याबाबत जनतेने तसेच अशासकीय संस्था / सामाजिक संस्था यांनी विषयांकित प्रकरणी राज्यशासनाकडे परस्पर पाठपुरावा करणे आवश्यक आहे. |
| ९. | उन्हाळी हंगामाकरिता २०० % दर ठेवण्यात यावेत. | अशी सूचना जलसंपदा विभागाने सुध्दा केली आहे. ही सूचना कृषी प्रवर्गासाठी स्वीकारलेली आहे. |
| १०. | कृषी उत्पादनाच्या एकूण किंमतीच्या तुलनेत कृषिसिंचन प्रशुल्क हे थोडा हिस्सा असावे. त्या हिश्श्याची निश्चिती ही अभ्यासाद्वारे तसेच जनतेबरोबरच्या सल्लामसलतीतून करावी. | पाणी प्रशुल्काची महत्तम मर्यादा अन्नधान्य पिकांचे बाबतीत उत्पादनाच्या एकूण किंमतीच्या ३ ते ५ % तर नगदी पिकांच्या बाबतीत ८ ते १० % असावी अशी शिफारस मागे स्थापन केलेल्या विविधसमित्यांनी केली आहे. २०१०-१३ साठी निश्चित केलेले वेगवेगळया पिकांचे प्रत्यक्ष प्रशुल्क वास्तविक या मर्यादांपेक्षा बरेच कमी आहे जर सवलतीही विचारात घेतल्यातर या मर्यादांची टक्केवारी अजून कमी होईल. |

| | च - कृषिसिंचन प्रशुल्क | |
|---|---|---|
| अनु.क्र. | प्राप्त अभिप्राय / सूचना | मजनिप्राचा प्रतिसाद |
| ११ | परिशिष्ट ७.१ मध्ये $V_1$ शेतासाठी वापरलेल्या एकूण पाण्याचे परिमाण आहे का शेतीसाठी घनमापनाद्वारे वापरलेले पाणी आहे याचा खुलास आवश्यक आहे. तसे असेल तर सुसंगत दराच्या निर्धारणासाठी पाणी वापर संस्थांनी वापरलेले पाणी म्हणजे $V_3$ असावयास हवे. | $V_1$ हे सिंचन प्रकल्पाच्या कालवा मुखशी सोडलेले पाण्याचे एकूण परिमाण आहे तर पाणी वापर संस्थांना लघुवितरिकेच्या मुखाशी पुरविलेल्या व आकारणी करण्यात येणाऱ्या पाण्याचे परिमाण $V_2$ आहे. कार्यक्षमता गुणक 0.64 वापरुन $V_2$ चे रुपांतर कालवा मुखाशी सोडलेल्या पाण्याच्या परिमाणाशी ($V_3$) केले आहे. त्यांनतर सिंचनासाठीच्या प्रचालन व परिरक्षण खर्चाचा $V_3$ मधील वाटा $V_3/V_1$ हे गुणोत्तर वापरुन परिगणित केला आहे. |
| १२. | पंतप्रधान पॅकेज मधील जिल्हयात ४ हेक्टर पेक्षा अधिक जमीन धारणा असलेले शेतकरी खूपच कमी आहेत. यास्तव ५० % सवलत त्यांनाही देण्यात यावी. | ही बाब चर्चेसाठी खुली राहील. |
| १३. | टीप : दृष्टिनिबंधाच्या प्रती तालुकास्तरावर उपलब्ध करुन दिल्यानंतर प्रतिसादात्मक विशेषत: नागपूर, लातूर, यवतमाळ, नाशिक व जळगाव या जिल्हयातील जवळजवळ ६५० शेतकऱ्यांनी तालुका कार्यालयात ठेवलेल्या नोंदवहीत त्यांचे अभिप्राय नोंदविले. सर्व साधारण मागणी अशी आहे..-<br>i. पणन व्यवस्थेतील त्रुटी व शेतकऱ्यांना तोंड द्याव्या लागणाऱ्या आपत्ती विचारात घेता विशेष करुन भात पिकासाठी पाण्याचे दर परवडण्याजोगे असावेत.<br>ii. नक्षलग्रस्त क्षेत्र व पंतप्रधान पॅकेजमधील जिल्हयांना असलेल्या सवलती अन्य भागाला लागू कराव्यात.<br>iii. भरणा करण्याच्या नियमितपणाबद्दल प्रशुल्कामध्ये ५० % सवलत द्यावी. | कालव्याद्वारे होणाऱ्या सिंचनावर प्रचालन व परिरक्षणाच्या खर्चाचा केवळ १४ % भार टाकला जातो. जमीन धारणेशी निगडीत अशा पुष्कळ सवलती दिलेल्या आहे.<br>कोष्टकामधील परवडण्याची क्षमता हया घटकाचे भारांकनास अधिक महत्व देण्यात आले आहे.<br>विदर्भामध्ये कराराखालील भात शेतीच्या दरातील सवलत आता दोन्ही हंगामांना लागू केली आहे. जनतेबरोबरच्या सल्लामसलत बैठकांच्या वेळी पाण्याचे दर निश्चित करण्याच्या पध्दतीचे सविस्तर स्पष्टीकरण करण्यात येईल.<br>सिंचनासाठी घनमापन पध्दतीने करावयाचा पाणी पुरवठा पाणी वापर संस्थांच्या स्थापनेशी व प्रणाली त्यांना हस्तांतरण करण्याशी निगडीत आहे. |

| | च - कृषिसिंचन प्रशुल्क | |
|---|---|---|
| अनु.क्र. | प्राप्त अभिप्राय / सूचना | मजनिप्राचा प्रतिसाद |
| | iv. कराराखालील खरीपातील भात शेतीकरिता देण्यात आलेल्या ५० % सवलतीचा लाभ रबीसाठी देखील लागू करावा.<br><br>कृषिसिंचनाचे दर परिगणित करावयाची पध्दत ही आकलन करण्यास कठीण आहे, अशी अडचण व्यक्त करण्यात आली. तसेच क्षेत्राधारित पाणी पुरवठयाऐवजी घनमापन पध्दतीने सिंचनासाठी पाणी उपलब्ध करुन देण्यात यावे हयाबाबतही आग्रही भूमिका मांडण्यात आली आहे. | |

| | छ - शासकीय उपसा योजना | |
|---|---|---|
| अनु.क्र. | प्राप्त अभिप्राय / सूचना | मजनिप्राचा प्रतिसाद |
| १. | शासकीय उपसा सिंचन योजनाचा प्रचालन व परिरक्षण खर्चाचा समावेश शासनाच्या एकूण प्रचालन व परिरक्षण खर्चात करण्यात यावा. प्रवाही क्षेत्र व उपसा क्षेत्र यांना समान वागणूक द्यावी कारण उपसाक्षेत्र हे अवर्षण प्रवण क्षेत्रात आहे. तथापि उपसाद्वारे होणारा पाणी वापर हा मूलभूत गरजेच्या दृष्टीने जीवनावश्यक पाणी इतक्या मर्यादेपर्यंत असावा. तसेच जास्ती उंचीच्या तसेच जास्ती लांबपर्यंतच्या पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या योजना हाती घेवू नयेत. | शासनाच्या जलप्रशुल्क आकारणीच्या दि. १३/९/२००१ च्या आदेशाप्रमाणे लाभाधारकाकडून उर्जाखर्च पिकाचा प्रकार व उपसा क्षेत्राची उंची हयाबाबत विचार करुन सेवाकर स्वरुपात स्वतंत्रपणे वसूल केली जाते. शासकीय उपसा योजनांचा उर्जाखर्च हा अर्थसहाय्य म्हणून द्यावयाचे किंवा कसे हयाबाबत शासनस्तर निर्णय होणे आवश्यक आहे. |

| | ज - खाजगी उपसा योजना | |
|---|---|---|
| **अनु.क्र.** | **प्राप्त अभिप्राय / सूचना** | **मजनिप्राचा प्रतिसाद** |
| १ | परिच्छेद ४.४.६ मध्ये खाजगी उपसा सिंचन योजनांच्या सर्व शेतकऱ्यांस स्थिर शुल्क आकारणी करण्याबाबत तरतूद आहे. अशा प्रकारच्या तदर्थ तरतूदीपेक्षा खाजगी उपसा योजनांचे जलप्रशुल्क हे सविस्तर अभ्यासावर आधारित परिगणित करुन तसेच जनसुनावणीद्वारे ठरविण्यात यावे. | खाजगी उपसा सिंचन योजनांसाठी क्षेत्राधारित जलप्रशुल्क निर्धारणाची पध्दती ही क्षेत्रीय अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या तपशीलावर तसेच महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने दिलेल्या माहितीवर आधारीत आहे. तरीपण याबाबत चर्चा करता येईल. |
| २. | परिच्छेद ४.१.९ व परिशिष्ट ४.१ खाजगी उपसा योजनांच्या जलप्रशुल्क आकारणीच्या पध्दतीमध्ये केलेल्या गृहितका मध्ये योग्य कारणमीमांसा नाही. जनसुनावणीद्वारे सल्लामसलत करुन दृष्टीनिबंध, निकष, जलप्रशुल्क आकारणी प्रस्ताव, जलप्रशुल्क आदेश इत्यादी अंतिम करण्यात यावे. | प्रारुप दृष्टीनिबंधावर होणाऱ्या जनसुनावणी दरम्यान दर निर्धारणाच्या निकषाबाबत चर्चा करता येईल<br>मजनिप्रा (ठोक जलप्रशुल्क निर्धारणाकरिता निकषांचे निश्चिती व आदेश काढणे) विनियम, २०१० नुसार विहीत केलेल्या पध्दतीचा अवलंब करण्यात येत आहे. |
| ३. | खरीप, रबी व उन्हाळी हंगामातील पिकांकरिता परिच्छेद ४.१.९ अन्वये नाममात्र वाढ सुचविली आहे. प्रस्तावित वाढीबाबत विशिष्ट माहितीचा समावेश सल्लमसलतीसाठी ठेवण्यात येणाऱ्या कागदपत्रात करण्यात यावा. | देखभाल व दुरुस्ती खर्चात सुमारे १० % वाढ तसेच आस्थापना खर्चात १५ % वाढ झाली असल्यामुळे २०१०-१३ च्या आकारणी प्रशुल्कामध्ये १० % वाढ प्रस्तावित केली आहे. |
| ४. | उपसा सिंचन योजनेसाठी कमी पाणी वापर होत असल्यामुळे प्रवाही सिंचनाच्या पेक्षा कमी जलप्रशुल्क आकारणी करण्यात यावी. | उपसा योजनांच्यासाठी भांडवली गुंतवणूक, विद्युत आकार आणि परिचलन व दुरुस्तीखर्च इत्यादीच्या अनुषंगाने दिलेल्या सवलतीचा विचार करता उपसा सिंचनासाठी जलप्रशुल्क कमी आहेत. |

| | झ - घरगुती वापराचे प्रशुल्क | |
|---|---|---|
| **अनु.क्र.** | **प्राप्त अभिप्राय / सूचना** | **मजनिप्राचा प्रतिसाद** |
| १. | पाण्याच्या व्यापारी प्रयोजनार्थ वापरासाठी घरगुती वापरासाठी असलेल्या दराप्रमाणे आकारणी करण्यात यावी. | सदर सूचना परवडण्याची क्षमता हया घटकाचा विचार करता मान्य करता येणार नाही. |
| २. | पाण्याचा पुनर्प्रक्रिया करुन वापर केल्यास प्रशुल्क आकारणी मूळ दराच्या ५० % (७५ % ऐवजी) प्रमाणे करावी. जर पुनर्प्रक्रिया केलेल्या पाण्याचे परिमाण जास्त असेल तर महानगरपालिकेला महसूल देण्यात यावा. | दृष्टिनिबंधातील परि. ४.२.४ कृपया पहावा. पूर्वीच्या (२०१०-१३) निकषांत परि. १३.२.२ मध्ये दिलेल्या सवलती आता मागे घेण्याचे प्रस्तावित आहे. पुनर्प्रक्रिया केलल्या पाण्याचे वापराबाबत महानगरपालिकेला मिळणा-या महसुलाबाबत दृष्टिनिबंधातील परिच्छेद-४.२.५ पहावा. |
| ३. | सांडपाणी प्रक्रिया केंद्राच्या (STP) देखभाल दुरुस्तीचा खर्च जलसंपदा विभागाने सोसावा. तसेच सांडपाणी प्रक्रिया केंद्रे चालविण्यासाठी लागणाऱ्या वीजेचे दर सिंचनासाठीच्या दराप्रमाणे असावेत. | जलसंपदा विभागामार्फत पाणी वापराचे परिमाण (quota) मंजूर करताना करावयाच्या करारनाम्यात वापरकर्त्या गटांनी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रमाणकांप्रमाणे सांडपाण्यावर प्रक्रिया करुन पाणी नदी/नाल्याप्रमाणे सोडण्याबाबत अट आहे. यास्तव जलसंपदा विभागाने सांडपाणी प्रक्रिया केंद्रांच्या प्रचालन व परिरक्षणाची जबाबदारी उचलण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. वीज दराबाबतचा प्रश्न हा पाणी प्रशुल्क निर्धारणाशी संबंधित नसून हया बाबत शासनाने निर्णय घ्यावयाचा आहे. |
| ४. | महानगरपालिकांना मूळ दराच्या १.२५ पट आकारणी न करता मूळ दराइतकी आकारणी करावी. | नगरपालिका क्षेत्रास अनुज्ञेय असलेल्या प्रतिव्यक्ति प्रति दिन १३५ लिटर पाण्यापैकी १५-२० लिटर प्रतिव्यक्ति प्रतिदिन पाण्याचा विनियोग पिण्यासाठी व स्वयंपाकासाठी होतो व इतर पाण्याचा विनियोग धुण्यासाठी, बागकाम, सफाई इत्यादीसाठी होतो. ग्रामीण भागासाठी अनुज्ञेय असलेला पाणी वापराच्या ४०/७० लिटर प्रतिव्यक्ती प्रतिदिन हया मापदंडाच्या तुलनेत नागरी भागातील वापरकर्त्यांना जास्त प्रमाणात पाणी उपलब्ध होते. तसेच परवडण्याची क्षमता ही नागरी भागातील लोकांची जास्त आहे. यास्तव ग्रामपंचायत, नगर |

| | झ - घरगुती वापराचे प्रशुल्क | |
|---|---|---|
| अनु.क्र. | प्राप्त अभिप्राय / सूचना | मजनिप्राचा प्रतिसाद |
| | | पालिका व महानगरपालिका यांच्या दरामध्ये तफावत ठेवण्यात आली आहे. |
| ५. | टंचाई काळात आरक्षण केलेल्या पाण्याबाबत बाष्पीभवन व वहनव्यय याचा भार लागू न करता प्रत्यक्ष वापरण्यात आलेल्या पाण्याच्या परिमाणावर आकारणी करावी. | टंचाई काळात सिंचनाचे पाणी कमी करुन घरगुती वापरासाठी पाणी आरक्षण केले जाते. आरक्षित पाणी पूर्णपणे वापरले जात नाही व बाष्पीभवनाद्वारे ते वाया जाते असा अनुभव आहे. म्हणून पाण्याचे दुर्मिळतेचे मूल्य अधोरेखित करण्यासाठी अशा प्रकारची तरतूद आवश्यक आहे. |
| ६. | विलंबाने भरणा या संदर्भात १५ दिवसांची मुदत वाढवून ती १ महिन्यापर्यंत करावी. | १५ दिवसांची मुदत ही सेवा पुरवठादार असलेल्या जलसंपदा विभागाने निश्चित केलेली आहे. ही बाब प्रशुल्क निश्चितीशी संबंधित नाही. |
| ७. | ५ वर्षांनंतर पाणी वापर करारनाम्याप्रमाणे नूतनीकरण करताना मंजूर पाणी वापराचे परिमाण (quota) वाढवून मिळावे. | साठवण करण्यात आलेले पाणी पाण्याच्या स्पर्धात्मक व वाढत्या मागणीमुळे दुर्मिळ झालेले आहे. पाणीवापरकर्त्या गटांनी वापलेल्या पाण्यावर पुनर्प्रक्रिया, जललेखा, मापदंडा मध्ये सुधारणा, अपव्यय कमी करणे या सारख्या जलसंवर्धनाचे उपाय योजावेत. करारनामा नूतनीकरण करताना वर उल्लेख केल्याप्रमाणे जलसंवर्धनाबाबत केलेली कार्यवाही न तपासता वाढीव पाणी परिमाण मंजूर करण्यामुळे जलसंवर्धन करण्यास प्रोत्साहन मिळणार नाही. |
| ८. | मंजूर पाणी वापराच्या परिमाणापेक्षा १० % पेक्षा अधिक वापरासाठी दंडनीय दर आकारण्यात येऊ नये. | मंजूर पाणी वापराच्या मर्यादेपेक्षा होणारा अतिरिक्त पाणी वापर अन्य वापरकर्त्यांच्या हिश्श्याला बाधित करतो. सबब अशा प्रयोजनाला उत्तेजन देता कामा नये. |

| | ञ - औद्योगिक वापरासाठी प्रशुल्क | |
|---|---|---|
| **अनु.क्र.** | **प्राप्त अभिप्राय / सूचना** | **मजनिप्राचा प्रतिसाद** |
| १. | दृष्टिनिबंधातील परिच्छेद ४.२.५ मध्ये नागरी स्थानिक संस्थांनी मजनिप्राने निश्चित केलेल्या दराने प्रक्रिया केलेले सांडपाणी कोणत्याही वापरकर्त्या गटाला विकण्याची अनुमती प्रस्तावित करण्यात आलेली आहे. तथापि मजनिप्राने विहित केलेल्या सूचीनुसार याचे नियमन व संनियंत्रण करण्यात यावे. नागरी स्थानिक संस्था प्रत्यक्षात प्रक्रिया करुनच वापरलेले पाणी नदी-नाल्यात सोडतील याची खातरजमा करण्यासाठी व्यवस्था बसविणे आवश्यक आहे. | नगरविकास विभागाने दि. १५/१०/२०१० रोजी निर्गमित केलेला शासन निर्णय कार्यवाहीत आणण्याबद्दलचा हेतू यामागे आहे. उत्सर्जित पाण्यावर प्रक्रिया करुन ते आवश्यक प्रमाणकांपर्यंत आणण्याबाबतचे संनियंत्रण ही महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची जबाबदारी आहे. |
| २. | दृष्टिनिबंधातील परिच्छेद ४.३.४ नुसार मका प्रक्रिया उद्योगाचा कृषिउद्योग प्रवर्गात समावेश करण्याबाबत प्रस्तावित केले आहे.<br>हा निर्णय कोणत्या बैठकीत झाला याचा तपशील द्यावा. मका प्रक्रिया उद्योगाद्वारे मद्यार्क निर्मिती सुध्दा केली जाते, यासाठी मूळ दराच्या ५ पट दराने आकारणी करावी. (मद्यार्क निर्मिती उद्योगांना कोणत्याही प्रकारची सवलत देऊ नये, अशी अन्य सूचना प्राप्त आहे.) | एका मका प्रक्रिया उद्योजकांकडून प्राप्त झालेल्या विनंती वर प्रस्ताव आधारलेला आहे. याबाबत कोणत्याही बैठकीमध्ये चर्चा झालेली नाही. निकषांमधील सवलती बाबतचा अंतिम निर्णय घेताना सदर सूचनांचा विचार करण्यात येईल. |
| ३ | दृष्टिनिबंधातील परिच्छेद ४.३.६ नुसार शून्य विसर्गयुक्त उद्योगांना सवलती देण्याचे प्रस्तावित केले आहे. तथापि वास्तवात शून्य विसर्ग असल्याबाबत खातरजमा करण्यासाठी यंत्रणा बसविणे आवश्यक आहे. | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाशी सल्ला मसलत करुन कार्यवाही करण्यात येईल. |
| ४ | दृष्टिनिबंधातील परिच्छेद ४.३.७ मध्ये नागरी स्थानिक संस्थांनी सोडलेले प्रक्रिया रहित सांडपाणी ते | उद्योजक असे प्रक्रिया रहित सांडपाणी नागरी स्थानिक संस्थांकडून स्वतंत्र पाईपलाईनद्वारे घेतील; त्यामुळे नैसर्गिक स्त्रोतामध्ये |

| | ञ - औद्योगिक वापरासाठी प्रशुल्क | |
|---|---|---|
| अनु.क्र. | प्राप्त अभिप्राय / सूचना | मजनिप्राचा प्रतिसाद |
| | वापरण्यात स्वारस्य असलेल्या प्रक्रिया उद्योग उद्योगांना पुरविण्याचे प्रस्तावित केले आहे. अशा प्रकारे देण्यात येणारे प्रक्रियारहित पाणी नैसर्गिक पाणी स्त्रोतात न मिसळू देता परस्पर (इच्छुक) उद्योगाकडे जाईल, याबाबत खातरजमा होणे आवश्यक आहे. खालील बाजूचे पाणी अशा प्रक्रियारहित पाण्यामुळे दूषित होता कामा नये. | मिसळण्याचा प्रश्न उदभवणार नाही. अशा वापरासाठी उद्योगांनी जलसंपदा विभागाकडे अर्ज करावयाचा असल्याने तो विभाग खालील बाजूस असलेल्या वापरकर्त्यांना (त्यांचे पाणी प्रदूषित होऊन) उपसर्ग होणार नाही याची दक्षता घेईल. |
| ५ | उद्योग क्षेत्राचे भवितव्य हे वापरलेल्या पाण्यावर पुनर्प्रक्रिया करणे / पाण्याचा पुनर्वापर करणे याशी निगडीत असल्याने हयासाठी जास्ती सवलती देणे आवश्यक आहे. | हयाबाबत सद्यस्थितीत देण्यात येत असलेल्या सवलतीच्या अनुषंगाने उद्योग क्षेत्रातील पाणी वापरकर्त्यांचा प्रतिसाद पाहून या पुढील प्रशुल्क आदेशाच्या वेळी याबाबत विचार करण्यात येईल. |
| ६ | कृषिउद्योग क्षेत्रातील साखर प्रक्रिया उद्योगास असलेले सवलतीचे दर इथेनॉल उत्पादन व प्रमुख उत्पादना बरोबर उर्जा निर्मिती हेही उत्पादन असलेल्या उद्योगांना देण्यात याव्यात. | हयाप्रमाणे प्रशुल्कात सवलती देणे म्हणजे सर्व बिव्हरेजेस उद्योग यांनाही त्याच धर्तीवर सवलती देणे असा आशय निघतो. सबब हे मान्य करता येणार नाही कारण साखर उद्योगास इथेनॉल / मद्यार्कनिर्मिती पासून तसेच सहऊर्जा निर्मितीतून आगोदरपासूनच लक्षणीय उत्पन्न मिळते. |
| ७ | मजनिप्राने विविध उद्योगांच्या प्रति एकक उत्पादनासाठी आवश्यक पाण्याचे रास्त परिमाण किती आहे याबाबत मजनिप्राने परिगणना करावी. | जून २०११ मध्ये मजनिप्राने तयार केलेल्या बिगरसिंचन हक्कदारीसाठी प्रसृत केलेल्या मसुदा निकषांमध्ये याबाबत तपशील दिला होता. तथापि हयाबाबत काहीही अभिप्राय / सूचना प्राप्त झालेल्या नाहीत. |
| ८ | उद्योगांकडून वापरलेल्या पाण्यावर पुनर्प्रक्रिया करुन पाणी मागणी कमी करण्याशी निगडीत असलेली सवलत अशा उद्योगांकडून प्रत्यक्ष पुनर्प्रक्रिया केलेल्या पाण्याच्या परिमाणावर आधारावी. | सेवापुरवठादाराकडे उपलब्ध असलेल्या पाण्यामध्ये अशा कमी केलेल्या मागणीमुळे किती बचत होईल यातच केवळ त्याला स्वारस्य असणार आहे. एखादा उद्योग एकूण मागणी कमी न करता वापरलेल्या पाण्यावर पुनर्प्रक्रिया केल्याबद्दल लाभासाठी दावा करीत असेल त्याचा जलसंपदा विभागाला उपयोग होणार नाही. |

| | ञ - औद्योगिक वापरासाठी प्रशुल्क | |
|---|---|---|
| **अनु.क्र.** | **प्राप्त अभिप्राय / सूचना** | **मजनिप्राचा प्रतिसाद** |
| ९ | ज्या उद्योगांकडून जलप्रदूषण केले जाते अशा उद्योगांना केवळ दंडनीय आकारणी करुन भागणार नाही. अशा उद्योगांना दंडनीय आकारणी शिवाय टप्प्या टप्प्याने पाणी पुरवठा कमी करणे इत्यादी उपाय योजना करुन अंतिमत: उद्योग बंद करण्यास भाग पाडावे. | अशा प्रकारची दंडनीय कारवाई करणे ही कृती महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कार्यकक्षेत येते. एखाद्या उद्योगाचा पाणी पुरवठा कमी करणे बाबत अथवा एखादा उद्योग पूर्णपणे बंद करणेबाबत महाराष्ट्र जलप्रदूषण नियंत्रण मंडळाने कार्यवाही करणे आवश्यक आहे. |
| १० | उद्योग क्षेत्राकरिताचे कोष्टकातील भारांकन ५६ वरुन ६५ पर्यंत वाढविले आहे त्याला काहीही शास्त्रीय आधार नाही. पूर्वी कोकणात पावसाळयातील विसर्गाला सवलतीच्या दराने आकारणी करण्याचा शासन निर्णय होता. त्याची अंमलबजावणी चालू ठेवावी. | सन २०१०-१३ साठीच्या निकषांमध्ये उद्योगक्षेत्रासाठीचे भारांकन ६३% होते, ५६% नव्हते. (५६% हा म.औ.वि. महामंडळासारख्या औद्योगिक तसेच घरगुती प्रयोजनासाठी पाणी घेणाऱ्या वापरकर्त्यांचा पाणी प्रशुल्क महसूलातील हिस्सा पूर्वीच्या तपशीलानुसार आहे.) खरीप हंगामातील पाणी वापराचे दर आता सुध्दा मूळ दराच्या ५०% करण्यात आले आहेत. म्हणजेच सवलत वेगळया स्वरुपात सुरु ठेवण्यात आली आहे. |
| ११ | उद्योग क्षेत्रासाठी असलेली द्विस्तरीय (प्रक्रिया उद्योगासाठी पाणी वापर व कच्चा माल म्हणून पाणी वापर) प्रशुल्क पध्दत यापुढे ही सुरु ठेवण्यात यावी. | हे मान्य करण्यात आलेले आहे. उद्योगांची प्रदूषण क्षमतेवर आधारित वेगळी वर्गवारी करण्याबाबतचा प्रस्ताव आता रद्द करण्याचे प्रस्तावित आहे. |
| १२ | वापरलेल्या पाण्यावर पुनर्प्रक्रिया केल्यास मूळ दराच्या ७५% ऐवजी ५०% प्रमाणे दर आकारावा. | हया पूर्वीच्या सवलतीबाबत उद्योगांकडून मिळालेला प्रतिसाद उत्साहवर्धक नाही. उद्योगांकडून विधायक प्रतिसाद प्राप्त झाल्यास हयाबाबत पुढे विचार करण्यात येईल. |

| | ट - प्रदूषण व पर्यावरणासाठी विसर्ग | |
|---|---|---|
| **अनु.क्र.** | **प्राप्त अभिप्राय / सूचना** | **मजनिप्राचा प्रतिसाद** |
| १ | मजनिप्रा अधिनियमातील तरतुदीनुसार प्रभावीपणे प्रदुषण नियंत्रण करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाशी समन्वय साधण्याच्या दृष्टीने दृष्टिनिबंधामध्ये परिणामकारक उपक्रम प्रस्तावित केलेला नाही.<br>प्रदूषणकर्त्यांकडून प्रदूषणामुळे झालेल्या हानीची पूर्ण भरपाई करुन घेणे व पर्यावरणाचा झालेला ऱ्हास भरुन काढणे यासाठी त्याला जबाबदार धरण्यात यावे.<br>'प्रदूषणकर्त्यानी किंमत चुकवावी' हया बाबत सर्वोच्च न्यायालयाने केलेल्या व्याख्येचा समावेश करण्यात यावा. | जल प्रदूषण मानके अमलात आणण्यासाठी समुचित प्राधिकरणाला सहाय्यभूत होईल अशारितीने महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाला प्रशुल्क निर्धारण हे केवळ एक साधन म्हणून वापरले पाहिजे. पर्यावरणीय हानीच्या भरपाईप्रीत्यर्थ खर्चाची वसुली यासारख्या उपाययोजना करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळानेच जल प्रदूषण कायद्यातील तरतुदींचा वापर केला पाहिजे व त्यानुसार आवश्यक उपाययोजना केल्या पाहिजेत. |
| २ | पर्यावरणीय पुनर्स्थापनेसाठी कराव्या लागणाऱ्या पाणी पुरवठयाच्या खर्चाचा भार शेतकऱ्यांवर टाकू नये. पर्यावरणीय दृष्टया आवश्यक असलेला किमान विसर्ग राखण्यसाठी सोडण्यात येणाऱ्या पाण्याच्या परिमाणाला अपव्यय समजू नये व प्रशुल्क निर्धारणामध्ये ते हिशोबात घेऊ नये. | पर्यावरण गरज म्हणून ज्यावर प्रशुल्क आकारता येईल अशा वेगळया प्रवर्गाचा दृष्टिनिबंधामध्ये प्रस्ताव नाही. तसेच पर्यावरणासाठी किमान विसर्ग धरणातून सोडण्याबाबतचा सुध्दा प्रस्ताव नाही. या बाबीवर प्रथम राज्यशासनाकडून धोरणात्मक निर्णय होणे आवश्यक आहे. |
| ३ | पर्यावरण दृष्टया आवश्यक कमीत कमी पाणी देणे ही एक प्रकारे ठोक हक्कदारी असून त्याचा प्रशुल्क निर्धारणामध्ये विचार व्हावा.<br>कृष्णा, कावेरी पाणीतंटा लवादांचे निवाडे आणि राष्ट्रीय जल धोरण यामध्ये पर्यावरणीय विसर्गाबाबत शिफारस आहे. | जलाशयामध्ये पर्यावरणासाठी विसर्गाचे आरक्षण हे धोरण म्हणून राज्यशासनाने अद्याप अंगीकारलेले नाही. असा धोरणात्मक निर्णय झाल्यावरच प्राधिकरण ते विचारार्थ घेऊ शकेल. अशारितीने या टप्प्यावर विसर्गासाठी प्रशुल्क आकारणीचा विचार नाही. |

| | ट - प्रदूषण व पर्यावरणासाठी विसर्ग | |
|---|---|---|
| **अनु.क्र.** | **प्राप्त अभिप्राय / सूचना** | **मजनिप्राचा प्रतिसाद** |
| ४ | मजनिप्राने असे विनियम करावेत की, नागरी संस्थांनी सांडपाण्यावरील प्रक्रियेसाठी उपलब्ध असलेला निधी अन्यत्र वळवू नये आणि सांडपाण्यावरील प्रक्रियेसाठी लागणारा खर्च भागविण्यासाठी प्रशुल्क आकारावे. | मजनिप्रा अधिनियमामध्ये नागरी स्थानिक संस्थांच्या अखत्यारीतील कारभारामध्ये हस्तक्षेप करण्याच्या दृष्टीने कोणतेही अधिकार प्राधिकरणास नाहीत.<br>प्राधिकरणाच्या कायद्यामध्ये ठोक पाणी पुरवठा करणाऱ्या सेवा पुरवठादाराच्या प्रचालन व परिरक्षण खर्चाची वसूली पाणी प्रशुल्कातून व्हावी अशी तरतूद आहे. नागरिक संस्थांनी त्यांचे सांडपाण्याची प्रक्रिया करण्यासाठी येणारा खर्च त्यांचे ग्राहकांकडून करणे अपेक्षित आहे. |

| | ठ - जलदराशी संबंधित नसलेल्या बाबी | |
|---|---|---|
| **अनु.क्र.** | **प्राप्त अभिप्राय / सूचना** | **मजनिप्राचा प्रतिसाद** |
| १ | अमरावती प्रदेशातील २.५ लक्ष हेक्टर सिंचन क्षेत्राचा भौतिक अनुशेष भरुन काढण्यासाठी मजनिप्राने केलेल्या कार्यवाहीबद्दल स्पष्ट करावे. | मा. राज्यपालांनी अमरावती प्रदेशातील १०६ बांधकामाधीन प्रकल्पांचे सनियंत्रण करणे प्राधिकरणावर सोपविले आहे. याबाबत प्राधिकरणाकडून त्रैमासिक प्रगती अहवाल त्यांच्या कार्यालयाकडे सादर करण्यात येतात. |
| २ | गोदावरी व तापी खोऱ्यातील विदर्भाच्या हिश्श्याच्या पाण्याचा विनियोग करण्याच्या दृष्टीने पाणीसाठे अद्याप बांधून झालेले नाहीत. याबाबत प्राधिकरणाची भूमिका काय आहे याबाबत स्पष्ट व्हावे.<br>विदर्भाच्या वाटयाला येणारे पाणी तसेच अनुदान इतरत्र वळविल्यामुळे झालेला अन्याय दूर करण्यात यावा. | मजनिप्रा अधिनियमातील कलम ११(च) नुसार नवीन प्रकल्पांना मान्यता देताना मा. राज्यपालांनी दिलेल्या निदेशाची पूर्तता करण्यात येते.<br>मजनिप्रा अधिनियम सुधारणा (एप्रील २०११) नुसार प्रकल्पांच्या क्षेत्रीय वाटपामधील बदल करण्यास राज्य शासन सक्षम आहे. तसेच मा. राज्यपालांच्या निदेशानुसार राज्यातील तीन प्रदेशांना अनुदानाची तरतूद करणे ही बाब राज्य शासनाच्या अखत्यारित आहे. |
| ३ | को.प. बंधारे / लघु प्रकल्प / साठवण तलाव इत्यादीचे नूतनीकरण होणे आवश्यक आहे. सिंचन व्यवस्थापनाची 'फड' पध्दत अशासकीय संस्थांच्या मदतीने विकसित करण्यात यावी. मालगुजारी तलावांचे नूतनीकरण करण्यात यावे. | अशा प्रकारच्या कामाचे नियोजन, अर्थ संकल्पन व अंमलबजावणी निधीच्या उपलब्धतेनुसार जलसंपदा विभागामार्फत केले जाते. |
| ४ | राज्यात सरासरी होणाऱ्या सिंचनाचे प्रमाण ८० हेक्टर प्रति दलघमी आहे. यवतमाळ व चंद्रपूर करिता अनुक्रमे दर्शविलेली १५५ हेक्टर/दलघमी व १७० हेक्टर/ दलघमी ही आकडेवारी स्वीकारार्ह नाही. प्रत्यक्ष सिंचनावर आधारित आकडेवारी उपलब्ध नाही. | जलसंपदा विभागाकडून दरवर्षी प्रसिध्द होणाऱ्या जललेखा, स्थिरांकन, सिंचन स्थितीदर्शक अहवाल इत्यादी या आधारसामुग्रीचा स्त्रोत आहे. कालवे व विहिरी यांच्याद्वारे होणारी प्रत्यक्ष सिंचनाची आकडेवारी सिंचनस्थितीदर्शक अहवालावर आधारलेली आहे. |
| ५ | ठोक पाणी प्रशुल्क परिगणित करताना यंत्रसामग्रीचा वार्षिक घसारा व भांडवली खर्चाच्या १ % रक्कमेचा विचार व्हावा म्हणजे नवीन भांडवली गुंतवणुकीसाठी निधी उपलब्ध होऊ शकेल. | अधिनियमातील ११ (घ) नुसार जलसंपत्ती प्रकल्पांच्या सिंचन प्रणालीच्या प्रचालन व परिरक्षण खर्चाची वसुली होईल अशा प्रकारे पाणी प्रशुल्क ठरविणेची तरतूद आहे. घसारा व भांडवली खर्चाचा काही हिश्श्याची वसुली करण्याबाबत अधिनियमात तरतूद नाही. |

| | ठ - जलदराशी संबंधित नसलेल्या बाबी | |
|---|---|---|
| **अनु.क्र.** | **प्राप्त अभिप्राय / सूचना** | **मजनिप्राचा प्रतिसाद** |
| ६ | राज्यातील जलविद्युत् प्रकल्पांसाठीचा पाणी वापर व खर्चाची वसुली यांचा अंतर्भाव दृष्टिनिबंधात करावा. कोयनेसारख्या प्रकल्पांचा पाणी वापर व्ययकारी आहे कारण ते पाणी समुद्राला मिळते. | जलविद्युत् प्रकल्पांची देखभाल व दुरुस्ती ही वेगळया शीर्षा अंतर्गत करण्यात येते व हा सिंचन व्यवस्थापनेचा भाग नाही. महावितरणाला हस्तांतरित केलेल्या तसेच खाजगी प्रवर्तकांकडे विकसित करण्यासाठी सोपविलेल्या प्रकल्पांचे बाबतीत शासनाने विहित केल्याप्रमाणे उपकराची आकारणी केली जाते. कोयनेतून पश्चिमेकडे वळविले गेलेले पाणी हा कृष्णा लवादाने पूर्ण विचारांती दिलेल्या निवाडयाचा भाग आहे. |